जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २१३ दिनांक - २८/०३/२०२५**

खराडी पोलीस स्टेशन पुणे शहर

# बांधकाम साईट वरील प्लंबिंगचे व इलेक्ट्रीकचे सामान,घरफोडी चोरी करून,टेम्पोतुन भरून नेणा-या टोळीला खराडी पोलीसांनी अटक करून ३ लाख २८ हजाराचा मुद्देमाल केला जप्त

खराडी पो.स्टे.पुणे गुन्हा रजि.नं.३२/२०२५ बी.एन.एस.३०५(अ),३३१(३),३३१(४),३(५) अन्वये दाखल गुन्हयाचे तक्रारदार वय ५२ वर्षे,रा.खराडी पुणे हे देवकर ॲन्ड मुव्हर्स फर्म खराडी पुणे येथील फर्म मध्ये अकाऊंटंट म्हणुन नोकरी करीत असून, दिनांक १०/०३/२०२५ रोजी सायंकाळी १९/३० ते दिनांक ११/०३/२०२५ रोजी सकाळी ०९/५० वा.चे.दरम्यान त्यांचे ऑफीसचा लाकडी दरवाजा व लोखंडी ग्रिलचे दरवाजाचे कुलूप लावुन बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने, ऑफीस चे दरवाजाचे लोखंडी ग्रिलचे कुलूप तोडून त्यावाटे आत मध्ये प्रवेश करून, फर्मचे ऑफीस मध्ये ठेवलेले १,५८,५६०/-रू.कि.चे.प्लंबिंगचे व इलेक्ट्रीकचे साहित्य,तक्रारदार यांचे संमतीशिवाय व लबाडीचे इराद्याने चोरी केल्याने वरील प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयातील चोरीस गेले मालाचा व अज्ञात चोरटयांचा,खराडी पोलीस स्टेशनचे तपास पथकातील पो.अधिकारी व पो.अंमलदार हे शोध घेत असताना, तपास पथकातील **पो.अंमलदार सुरेंद्र साबळे व सचिन पाटील** यांना घटने ठिकाणी असलेल्या सीसीटिव्ही फुटेज व्दारे २-३ संशयीत महिला,घटना ठिकाणाहुन माल चोरी करून घेवुन जात असल्याचे निष्पन्न झाले. त्या दोघांनी सदर संशयीत महिलांचा विविध ठिकाणचे सीसीटिव्ही फुटजेची पाहणी करून त्याव्दारे सदरचे संशयीत महिला रिक्षां मधुन व पुढे दुस-या एका टेम्पो मध्ये चोरीचा माल भरून जात असल्याचे निष्पन्न करून, त्याव्दारे टेम्पोचा नंबर प्राप्त करून व गोपनीय बातमीदार यांचेकरवी दाखल गुन्हयामध्ये चोरीचा माल घेवुन जाणारा टेम्पो चालक आरोपी नामे **१) आबा गोविंद जाधव, वय ४१ वर्षे,रा.स्वामी समर्थ कॉलनी,गल्ली नं.०३,काळेपडळ,हडपसर मुळ रा.सिध्दटेक जलालपुर,कर्जत जि.अहिल्यानगर** यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता त्याने गुन्हयाची कबुली देवुन,त्याने व त्याचे नातेवाईक असलेल्या महिला नामे १)सुरेखा तात्या चौधरी,वय २४ वर्षे,रा.स्वामी समर्थ कॉलनी,गल्ली नं.३, काळेपडळ,हडपसर पुणे मुळ २)राणी शिवाजी गायकवाड,वय २९ वर्षे,रा.सदर ३)सुनिता आबा ऊर्फ रामाजाधव, वय २५ वर्षे,रा.सदर असे सर्वांनी मिळुन गुन्हयातील माल चोरी केल्याचे सांगितले आहे.सदर गुन्हयात निष्पन्न झालेले वर नमुद आरोपी यांना दाखल गुन्हयात अटक करून त्यांनी चोरी केलेला १,५८,५६०/-रू.कि.चे. प्लंबिंगचे व इलेक्ट्रीकचे साहित्य तसेच त्या सर्वांनी गुन्हयाचे कामी वापरलेला १,७०,०००/- रु.किं.चा एक टेम्पो असा एकुण ३,२८,५६०/-रू. कि.चा माल जप्त करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परि-४ पुणे शहर,श्री.हिंमत जाधव मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग, पुणे शहर, श्रीमती प्रांजली सोनवणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक खराडी पोलीस स्टेशन श्री.संजय चव्हाण,यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.निरी,साहेबा पोटे,पो.उप.निरी राहुल कोळपे. पो.अमंलदार सुरेंद्र साबळे, अमित जाधव,सचिन रणदिवे,महेश नाणेकर,श्रीकांत शेंडे,सचिन पाटील,श्रीकांत कोद्रे,सुरज जाधव,मुकेश पानपाटील,प्रविण गव्हाणे, म.पो.अमंलदार पुजा डहाळे, राजश्री घुले यांनी केले आहे.